Cosmos Multidisciplinary Research E-Journal
Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal
Impact Factor 4.94
ISSN No. 2456-1665

# पहिला बाजीराव पेशवा आणि नागपूरकर भोसले यांच्यातील संबंधाची ऐतिहासिक चिकित्सा

**श्रीकांत पांडूरंग तळेकर**
**संशोधक विद्यार्थी**
चिखली ता. चिखली जि. बुलढाणा
मो. ९२८४६१८०२२

**प्रस्तावना :**

परसोजी भोसले हे शिवाजी महाराजांच्या तालमीत तयार झाले असुन त्यांनी गोंडवाना व वऱ्हाड प्रातांत मराठ्यांचा अंमल बसवला त्यामुळे छत्रपती राजारामाने १६९९ मध्ये त्यांना सेनासाहेब सुभा हा किताब दिला. इ.स. १७०७ मध्ये परसोजी शाहुला मिळाल्याने या घराण्यावर शाहुची मर्जी होती. परसोजीच्या मृत्युनंतर  कान्होंजीला आधिकार मिळाला. कान्होंजीने कटक पर्यंत स्वाऱ्या केल्या व मराठी सत्तेचा विस्तार केला. शाहुला मदत केली या घराण्याचा विकास होण्यासाठी छत्रपती शाहु कारणीभूत होता. पेशव्याचा त्यात काही ही हस्तक्षेप नव्हता म्हणून या भोसल्यानी पेशव्यांना जुमानले नाही. ही परस्परांमधील चुरस मराठे शाहित कायम होती.

**पेशवा बाजीरावास भोसल्यांचा विरोध :**

स्वराज्याबाहेरील मुलखातील चौथाई, सरदेशमुखीचे हक्क वसुल करण्याचे शाहुने दक्षिणेस येताच निरनिराळया सरदाराना वाटून दिले. वऱ्हाड, खानेदश, नेमाड, माळवा या प्रदेशाचा मोकासा २४ जानेवारी १७१७ रोजी कान्होंजीस दिल्याचा उल्लेख पेशवे दप्तरात मिळता. बाजीराव पेशवे पदावर येईपर्यंत कोन्होंजी भोसले यांच्यावर नियंत्रण नव्हते तो स्वेच्छाचारी होता. पुढे बाजीरावाने बागलाण, खानदेश, माळवा या प्रातांत मुलुखगीरी सुरू केली. तेव्हा परस्परांच्या क्षेत्रात टकराव होऊन कान्होंजीशी बाजीरावाचा विरोध निर्माण झाला होता, तो शाहुला सोडविता आला नाही. म्हणून शाहुने १७२२ रोजी हुकुम सोडला परंतु कान्होंजी तो मानणार नाही. तेव्हा ते काम बाजीराव यांच्याकडे सोपविले. कान्होंजी भोसले निजामाकडे फितूरी करतो असा संशय शाहुला आला.[1] यासाठी शाहुने त्याची कानउघाडणी केली. त्याचा परिणाम तो अल्पकाळ आज्ञेने वागु लागला. परंतू पुढे लवकरच त्याने निजामाशी संधान बांधल्याने १७२५ मध्ये शाहुने त्यांच्यावर स्वारी केली. नागपूरकर भोसले यांचे पेशव्यांशी नेहमी वितुष्ट राहीले. दरम्यान कान्होंजी व रघूजी

या काका पुतण्यामध्ये बेबनाव निर्माण झाला. इ.स. १७१३ मध्ये छत्रपत शाहुने कान्होजीस जो सरंजाम करून दिला होता त्यापैकी छत्रपती शाहुने दोन भाग कान्होंजीस देऊन तिसरा भाग राणोज व रघूजी यांना देऊ केला होता, त्यामुळे कान्होंजी नाराज झाला होतार. पुढे कान्होंजीच्या समाधानासाठी छत्रपती शाहुनी संरजामाचे तीन हिस्से कान्होंजीला दिले व चौथा हिस्सा राणोजी व रघोजीला ठरवून दिला. इकडे बाजीरावने माळव्याची मोहिम चालविली होती. तेव्हा त्याला वऱ्हाडचा भोसले याची शक्तीची गरज वाटू लागली. परंतू कान्होंजी भोसले पेशव्यांशी फटकून वागत असल्यामुळे बाजीराव यांने राघोजीला जवळ करून इ.स. १७२८ मध्ये करार केला की, राणोजीने फौजेनिशी माळव्यात सहभागी व्हावे आणि त्याब÷ल उभयंतानी एकमेकांच्या प्रदेशात उपद्रव करू नये. पेशव्यांच्या मोकासबाबी वऱ्हाडात व भोसल्यांच्या दक्षिणमध्ये पेशव्यांच्या हद्दीत असे हा राणोजीने पेशव्याशी केलेला करार कान्होंजीस आवडला नाही. कान्होंजीला भेटून आपल भांडण मिटवाव म्हणून बाजीरावाने दोन सरदार कान्होजीकडे पाठविले तेव्हा कान्होजीन कलह केला ही तक्रार बाजीरावाने शाहुकडे केली. पालखेडवर बाजीरावाची चढाई झालेली पाहून कान्होजी बंडखोरी करून राज्यातून निघून गेला याचा उल्लेख पेशवे दप्तरात मिळतो.[२]

कान्होजीच्या शौर्यामुळे रघुजीच्या पुढे येण्यास वाव मिळाला नव्हता. कान्होजी व रघूजी दोघे पराक्रमी होते. नागपूरकर भोसले व पेशवे यांचे नेहमी वितुष्ट राहिले तरी ते प्रसंगी एकमेकांस मदत करित होते, तरी ही त्यांचे संबंध विरोधाचे होते. त्यांच्या दुहीमुळे मराठी साम्राज्याचे मोठे नुकसान झाले. पेशव्यांशी किंवा छत्रपतीशी एकजुट करण्याची बुद्धी दोघानाही होती.[३]

पण रघुजीला प्रसंगानुसार माघार घेण्याची कला अवगत होती. ती कान्होजी जवळ नव्हती म्हणून कान्होजी फसला व रघूजी यशस्वी झाला. पुर्व हिंदुस्थान व समग्र गोंडवाणा रघुजीने जिंकून नागपूरचे राज्य मजबूत केले. मराठे शाहीचे उद्दिष्ट बाजूला सारून मध्यवर्ती सत्तेशी फटकून वागण्याची वृत्ती असल्यामुळे त्याचे राज्य दुर्बल बनले पण त्याची बाधा स्वराज्याला झाली.[४]

छत्रपती शाहुने वारंवार रघुजी भोसल्याचा निषेध केल्याचे आढळून येते. "ऐवजा विषयी तुम्ही निकाल करून पाठविला नाही. डोळे झाक करून परिणाम लागतो असे नाही यास्तव हे आज्ञापत्र सादर केले असे असता यावयाचा विचार केला नाही, तरी जे क्षणि पत्र पावेल त्याक्षणी स्वार होऊन स्वामी जवळ येणे."[५] यावरून रघूजी प्रत्यक्ष शाहुला किती मानीत होता हे दिसून येते.

मध्यवर्ती सत्तेपासुन वऱ्हाड व नागपूर प्रांत एका बाजूस होता त्यामुळे रघुजीस जेरीस आणने पेशव्यांना अवघड गेले. बाबूजी नाईक, गायकवाड हा सुद्धा पेशव्यांच्या विरूद्ध होता. पेशवे भोसले यांच्या विरोधात सुरूवात इ.स. १७३८मध्ये झाली. इ.स. १७३८ मध्ये पेशवा बाजीरावाने मोठ्या धैर्याने दिल्लीपर्यंत स्वारी करून दिल्लीवर मराठ्यांची वचक निर्माण केली. माळवा प्रांत मराठ्यांना मिळवून दिल्याशिवाय सर्व दक्षिणेस चौथाई व सरदेशमुखीचे फक्त बंगाल, अलाहाबाद, गया, बनारस, मथुरा या भागात पेशवा बाजीरावाने हक्क वसूल करण्याचा प्रयत्न चालला होता. या प्रकरणात बाजीरावाची निजामाशी भोपाळ या ठिकाणी लढाई झाली. पेशवा बाजीरावाने निजामाची भोपाळ येथे रसद बंद केली. निजामाने दक्षिणेकडून सैन्याची मदत मागितली परंतू मध्येच बाजीराव व चिमाजी यांनी निजामाच्या सैनिकांना अडकविले. बाजीरावाचे हे जंगी कारस्थान यशस्वी झाले असते तर पेशवा बाजीरावाच्या मागणीप्रमाणे, बादशहाकडून माळवा, गुजरात प्रांत मराठ्यांना मिळून स्वराज्याचा बराच फायदा झाला असता कारण खानदौरान हा पेशवा बाजीरावास अनुकूल असून निजाम व खानदौरान यांच्यात चुरस होती.[६]

त्यामुळे निजामाचा पाडाव व्हावा अशी खानदौरानची इच्छा होती. अलिकडेच प्रकाशीत झालेल्या साधनावरून असे दिसते की प्रथम रघुजीचा विचार बाजीरावाच्या मदतीला जाण्याचा होता चिमाजी अप्पा हा तापीतिरी दक्षिणेकडून निजामाच्या मदतीस जाणाऱ्या मोगल सैन्यास अडकवविण्याकरिता राहिला होता. खानदौराने रघुजीस पत्र लिहून कळवितो तो म्हणतो. "आमचा मनसूबा होता जे राजश्री कान्होजी बाबा भोसले मोर्चा जागा भाम येथे जावून ते स्थळ हस्तगत करावे.[७] परंतू हे कार्य कठीण असल्यामुळे जाणून तो विचार टाकू राजश्री रायाकडे जावयाचा उद्देश कुंच करून माघारे फिरून तीबर्डी नजीक घाट तोंड आले. तव सुजायत खान अळजपूरचा सुबा गर्वाभिमाने फौज बंदी पोखत करून आडवा चालून आला. त्यासी आम्हासी युद्ध तुंबळ झाले. राजश्री स्वामीचे पुण्य प्रमाणे व आपले कृपेवरून त्यास हतबल करून हस्तगत केले. उदरी मजलदरमजल फौजे निशी राजश्री रायांकडे जात आहेत." परंतु या पत्रानुसार रघुजी पेशवा बाजीरावकडे न जाता उत्तरेस अलाहाबादकडे गेला.[८]

बाजीरावाने भोपाळचा वेढा दिला तेंव्हा त्यास सैन्याची फार मोठी गरज होती. त्याने सर्व सरदाराना पत्र दिले. रघुजी भोसले यालादेखील पत्र पाठविले. पेशवा बाजीरावाने रघुजीला कळकळीची विणवणी केली व शेवटी धमकीचे पत्र पाठविली परंतू सर्व व्यर्थ, रघुजीने बाजीरावाला मुळीच मदत पाठविली नाही. उलट बाजीराव माळव्यात गुंतला आहे अशी संधी साधून अलाहाबाद प्रांतात स्वारी केली. बुंदेलखंडातील

वेढा मांडला हे प्रांत जिंकले. यामुळे पेशवा बाजीरावाने दिलीच्या बादशाहाशी जे धोरण बांधले होते त्यात बाधा आली. बुंदेल खंडात पेशव्यांच्या मुलखात पूर्वीचाच असल्यामुळे पेशवा तो प्रांत आपल्या कार्यक्षेत्राखाली म्हणून समजत असे. त्यामुळे बाजीरावाला रघुजीच्या या स्वारीचा फार राग आला.[९]

भोपाळच्या वेढ्यात बाजीराव गुंतला असता त्याला मदत करण्याचे सोडून रघुजीने अलाहाबद पर्यंत स्वाऱ्या केल्या. त्यातून पुष्कळ लुट आणली व तेथील सुभेदार सुजाखान याचा पराभव करून त्यास ठार मारले. असा आतापर्यंत समज होता. ही सर्व गोष्ट ग्रंथात आढळल्याने परंतू या अलाहबादच्या स्वारीचा उल्लेख ग्रॅड डफ याने भाग - १ पृ.क्र. ३९२ मध्ये केला आहे. ही हकीकत सांगता डफ साहेबाने त्या विधानाच्या पुष्टीसाठी काहीही आधार दिला नाही. त्या स्वारीचे वर्णन इतरत्र कुठेही आढळत नाही. त्यामुळे गो.स.सरदेसाई हे ही या स्वारी बदल साशंक आहेत. परंतु आता अस्सल कागपत्रावरून एवढे तरी खास म्हणता येईल की, त्या सुजा खानचा रघुजीने पराभव केला तो आलाहाबादचा सुभेदार नसून यलजीपुरचा निजामाचा सुभेदार होता. रघुजीने चिमाजीसे पत्र पाठविले आहे याचा उल्लेख मिळतो. अलाहबादचा सुजाखान याचा पराभव व मृत्यु याबद्दल संशय वाटतो.[१०]

पेशवा बाजीरावाने निजामाचा पराभव करून त्याच्याशी तह केला. त्याने माळवा प्रांत मराठ्यांना दिला. नर्मदा व चंबळ या दोन नद्यांच्या मुलाख्यावर मराठ्यांची सत्ता प्रस्थापीत झाली. शिवाय मोगल बादशाहकडून ५० लाख रूपये देण्याचे निजामाने बाजीरावला कबुल केले. रघुजीच्या सनदेत जेंव्हा पेशवा स्वारीस निघेल तेंव्हा त्याच्याबरोबर मोहीमेवर जाण्याचा करार असून पेशवा बाजीरावाने बोलविले असता रघुजी गेला नाही. याब÷ल बाजीरावाला रघुजीचा राग आला. पेशवा बाजीरावा व रघुजी यांच्यातवाद निर्माण झाल्यामुळे बाजीरावाने रघुजीस शिक्षा करण्याचे ठरविले. निजामाच्या भानगडीतून मुक्त होताच त्याने आपला सरदार आबाजी कवडे याला रघुजीस पराभूत करण्यासाठी पाठविले व त्याच्या मदतीस अंताजी मानकेश्वर याला पाठविले होते. रघुजीने आबाजी कवडेवर आपले सरदार कृष्णाजी आटोळे व अलिखान यांना पाठविले हे सदरार रघूजीच्या पदरी होते.११

अमरावतीजवळ अंजनगाव सुरजी येथे लढाई झाली. पुन्हा नागपूर येथे संघर्ष होवून लढाई झाली. त्यात आबाजीच्या सैनीकांचा पराभव होवून ते पळून गेले. रघुजी व आबाजीची प्रत्यक्ष लढाई झाल्याचे दिसून येत नाही. आबाजी कवडे हा भोसले यांच्या प्रदेशात लुटालुट करू लागल्याने रघुजीने बाजीरावाची शाहुकडे तक्रार केली त्यावरून शाहुने बाजीरावास पत्र लिहिले. "राजश्री रघुजी भोसले सेना साहेब सुबा, यांच्या

संरजामात तुम्हा कडील फौज जावून धामधूम करतात तर आबाजी कवडे वैगेरे आपनाकडील सरदार ताकीद करून वाऱ्हाड प्रांतास फौज न जाई. ते गोष्टी करणे याचा उल्लेख आहे." बाजीराव स्वत: रघुजीवर स्वारी करण्याच्या विचारात होता. परंतु शाहु महाराजांच्या वरील पत्रामुळे व दिल्लीवर नादीरशाहाची स्वारी झाल्यामुळे त्याने हे घरगुती तंटे सोडून उत्तरेस जाण्याच्या तयारीस लागला. बाजीराव एका पत्रात लिहितो "रघुजी भोसले यांचा घरगुती तंटा शिल्लक आहे. पोर्तुगिजांचा काही हिशेब नाही. हिंदूस्थानातील हिंदू-मुसलमान यास नादिरशाह हा एक परकिय शत्रु आह. सर्वांनी मिळून त्यास बाहेर हाकलून लावले पाहिजे." या पत्राचा उल्लेख ग्रँड डफ याचा खंड १ मध्ये असून या पत्राचा उल्लेख मिळतो.[१२]

**निष्कर्ष :**

थोडक्यात पेशवा बाजीराव आणि रघुजी भोसले यांच्यातील दुहीमुळे काही काळ मराठी स्वराज्यात अंदाधुंदी माजली होती. जर भोसल्यांनी पेशव्यांची मदत केली असती तर परकिय शत्रुचा काटा मोडता आला असता.

**संदर्भ :**

१) काळे : नागपूरकर भोसल्यांची बखर, पृ. क्र. ९५-९६.
२) सरदेसाई गो.स. : नागपूरकर भोसले कालीन पत्रव्यवहार, पृ. क्र. ५०-५७.
३) सरदेसाई गो.स. : नागपूरकर भोसल्यांची कामगीरी, मुंबई १९३२, पृ. क्र. ५०-५७.
४) उपरोक्त पृ. क्र. ५६-५७.
५) जोशी श.ना.: दाभाडे दप्तर पुणे, १९५१ पृ.क्र. १११.
६) उपरोक्त पृ. क्र. ११५.
७) उपरोक्त पृ. क्र. ११७-११८.
८) पारसनिस द.ब. : पेशवा दप्तर खंड -६ पृ.क्र. ९४.
९) भावे वि.ल. : मराठी दप्तर साल तिसरा ठाणे, १९२८, पृ.क्र. ७४.
१०) उपरोक्त पृ. क्र. ८६.
११) पवार अप्पासाहेब : ताराबाई कालीन कागदपत्रे, कोल्हापूर १९६९, पृ.क्र.४६
१२) राजवाडे वि.का. : पेशव्यांची शकावली खंड-२ पुणे, १९६२.